दि.कि.अर्ज क्र. ३८६/ २०२६
बापुराव वि. निरंक

| | |
|---|---|
| MHLA120010552026 | **निशाणी क्रमांक १२ वरील आदेश** |

अर्ज व अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्ज दाखल करतेवेळी अर्जदार क्र.५ यांचे नाव टंकलेखनाच्या चुकीने साकरु बालाजी बिराजदार असे झालेले असुन तिचे खरे नाव गोकर्णा बालाजी बिराजदार असे आहे. त्यामुळे अर्जदार मुळ अर्जात गोकर्णा बालाजी बिराजदार या नावाची दुरुस्ती परवानगी मागत आहेत. अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ नि.क्र.१३ कडे अर्जदाराचे शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जाचे स्वरुप व आवश्यक ती दुरुस्ती पाहता असे दिसुन येते की, सदरची चुक ही नजरचुकीमुळे झालेली आहे. त्यामुळे अर्जदार क्र.५ यांच्या नावामध्ये गोकर्णा बालाजी बिराजदार अशी दुरुस्ती करणे अंतिम न्यायनिर्णयाकरीता उचित वाटते. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मत नोंदवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| ०२. | वादीने १४ दिवसांच्या आत सदर दुरूस्ती करणेची आहे व दुरूस्ती प्रत दाखल करणेचे आहे. |

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.06.15 17:41:11 +0530

निलंगा
दि. १५/०६/२०२६

( श्रीमती. के. पी. गाडे )
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर
निलंगा, जि.लातूर